# “विकसित महाराष्ट्र २०४७”

## कृषि उत्पन्न बाजार समिती …………………

१. तालुका

२. जिल्हा

३. पत्ता-

४. दुरध्वनी क्र.

५. E-Mail :

६. Website Address:

## व्यवसाय विकास आराखडा
## २०२५-२६ ते २०२९-३०



# व्यवसाय विकास आराखडा
# २०२५-२६ ते २०२९-३०

**कृषि उत्पन्न बाजार समिती …………………**

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | बाजार समितीचे नाव | |
| २. | पत्ता | |
| | | **तालुका** |
| | | **जिल्हा** |
| | | ईमेल |
| | | दुरध्वनी क्र |
| | | **Website Address:** |
| ३. | सभापती / प्रशासकाचे नाव | |
| ४. | फोन नं. | |
| ५. | सचिवाचे नाव | |
| ६. | फोन नं. | |
| ७. | कार्यक्षेत्रातील गावांची संख्या | |
| ८. | बाजार आवार क्षेत्र | |
| ९. | उपबाजार संख्या | |
| १०. | उपबाजार हेक्टर | |
| ११. | लोकसंख्या | |
| १२. | बाजार समितीकडील इंजिनिअर | |
| १३. | बाजार समितीकडील आर्कीटेक्ट | |
| १४. | इतर तांत्रिक कर्मचा-यांबाबत माहिती | |

**सचिव**
**कृ.उ.बा.स--------**

**सभापती**
**कृ.उ.बा.स--------**

**तक्ता क्र. २**

**बाजार समितीची मागील ५ वर्षातील आर्थिक स्थिती**

| **१** | **उत्पन्न** | **सन २०२१-२२** | **सन २०२२-२३** | **सन २०२३-२४** | **सन २०२४-२५** | **सन २०२५-२६** |
|---|---|---|---|---|---|---|
| | १. बाजार फी | | | | | |
| | २. गुंतवणुकीवरील उत्पन्न | | | | | |
| | ३. इतर उत्पन्न | | | | | |
| **२** | **खर्च** | | | | | |
| | १. आस्थापना खर्च | | | | | |
| | २. प्रशासकीय खर्च | | | | | |
| | ३. इतर खर्च | | | | | |
| ३ | **वाढावा/ तूट रु.** | | | | | |

**तक्ता क्र. ३**

**बाजार समिती आर्थिक स्थिती**

**१)** वर्ग-
**२)** मंजूर आस्थापना टक्केवारी

| **अ.क्र.** | **वर्ष** | **उत्पन्न रु.** | **खर्च रु.** | **आस्थापना खर्च** | **टक्केवारी** | **वाढावा रु.** | **तूट रु.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१)** | २०२१-२२ | | | | | | |
| **२)** | २०२२-२३ | | | | | | |
| **३)** | २०२३-२४ | | | | | | |
| **४)** | २०२४-२५ | | | | | | |
| **५)** | २०२५-२६ | | | | | | |
| **एकुण** | | | | | | | |

**तक्ता क्र. ४**

**बाजार समिती कार्यक्षेत्रातील प्रमुख कृषि उत्पन्न (प्रमुख पिके)**

| अ.क्र. | पिकाचे नाव | जिल्ह्यातील आवक | कार्यक्षेत्राबाहेरील आवक | एकुण आवक |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

**तक्ता क्र. ५**

बाजार समितीमध्ये झालेल्या आवकेचा तपशिल खालीलप्रमाणे

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शेतीमाल प्रकार/ पिकाचे नाव</th><th>जिल्ह्यातुन होणारी आवक (क्विंटल)</th><th>राज्यातुन होणारी आवक (क्विंटल)</th><th>परराज्यातुन होणारी आवक (क्विंटल)</th><th>परराष्ट्रातुन होणारी आवक (क्विंटल)</th><th>एकुण</th></tr>
<tr><td colspan="2">जिल्हे / राज्य / परराष्ट्र</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>१</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>टक्केवारी</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>टक्केवारी</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>टक्केवारी</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>४</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>टक्केवारी</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>५</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>टक्केवारी</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

**१)** जिल्हा (स्थानिक) सुमारे आवक -----टक्के इतकी आहे.
**२)** राज्यामधुन सुमारे आवक ---- टक्के झाली आहे.
**३)** परराज्यातून सुमारे आवक - --टक्के इतकी आहे.
**४)** परराष्ट्रातुन सुमारे आवक --- टक्के इतकी आहे.

**तक्ता क्र. ६**

**बाजार समितीमधून जावक शेतीमालाचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | शेतीमाल प्रकार/ पिकाचे नाव | जिल्ह्यातील जावक (क्विंटल) | राज्यातील जावक (क्विंटल) | परराज्यातील जावक (क्विंटल) | परराष्ट्रातील जावक (क्विंटल) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हे / राज्य / परराष्ट्र | | | | | | |
| १ | | | | | | |
| | टक्केवारी | | | | | |
| २ | | | | | | |
| | टक्केवारी | | | | | |
| ३ | | | | | | |
| | टक्केवारी | | | | | |
| ४ | | | | | | |
| | टक्केवारी | | | | | |
| ५ | | | | | | |
| | **एकुण** | | | | | |
| | टक्केवारी | | | | | |

१) जिल्हा (स्थानिक) सुमारे जावक -- टक्के इतकी आहे.
२) राज्यातील सुमारे जावक -- टक्के झाली आहे.
३) परराज्यातील सुमारे जावक -- टक्के इतकी आहे.
४) परराष्ट्रातील सुमारे जावक -- टक्के इतकी आहे.

**तक्ता क्र. ७**

**बाजार समितीमधील आवकेचा कल**

| अ.क्र | महीना | पिकाचे नाव | | पिकाचे नाव | | पिकाचे नाव | | पिकाचे नाव | | पिकाचे नाव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आवक | सरासरी दर | आवक | सरासरी दर | आवक | सरासरी दर | आवक | सरासरी दर | आवक | सरासरी दर |
| १) | | | | | | | | | | | |
| २) | | | | | | | | | | | |
| ३) | | | | | | | | | | | |
| ४) | | | | | | | | | | | |
| ५) | | | | | | | | | | | |

**कार्यालयीन टिपणी**

**१)**

**२)**

**तक्ता क्र. ८**

**बाजार समिती कार्यक्षेत्रातील साठवणूक व्यवस्था**

| अ.क्र | वर्गवारी | आकार | क्षमता मे. टन | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | स्वतःच्या मालकीची गोदामे | | | |
| २ | सहकारी गोदामे | | | |
| अ) | महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटींग फेडरेशन प्रा. लि. | | | |
| ब) | भारतीय मध्यवर्ती सह. ग्राहक भांडार | | | |
| ३ | **शासकीय गोदामे** | | | |
| अ) | मॅफको | | | |
| ब) | नॅशनल सीडस कार्पोरेशन | | | |
| क) | महाराष्ट्र राज्य बी बीयाणे महामंडळ | | | |
| ड) | नाफेड | | | |
| इ) | जिल्हा परिषद | | | |
| ४ | महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदामे | | | |
| ५ | खाजगी | | | |

**तक्ता क्र. ०९**

**बाजार समितीमधील उपलब्ध सुविधा**

मुख्य बाजार व उपबाजाराची माहिती स्वतंत्रपणे

| | मुख्य बाजार | | | उपबाजार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सुविधा | संख्या | क्षमता | सुविधा | संख्या | क्षमता |
| १) | | | | | | |
| २) | | | | | | |
| ३) | | | | | | |
| ४) | | | | | | |
| ५) | | | | | | |
| ६) | | | | | | |

१) बाजार समितीची बलस्थाने

१)
२)
३)
४)

२) बाजार समितीच्या मर्यादा

१)
२)
३)
४)

३) बाजार समितीमध्ये आवक न येण्याची कारणे व वाढीसाठी नियोजन

१)
२)
३)
४)

४) कृषि उत्पादन बाजारात येण्याची व बाहेर जाण्यासाठी वाहतुक साधने.

१)
२)
३)
४)

**तक्ता क्र. १०**

**बाजार समितीमध्ये निर्माण करावयाच्या सुविधा**

| अ.क्र. | **सुविधा** | **क्षमता** | **मागील वर्ष वाढावा** | **अंदाजे खर्च** | **अपेक्षित प्रति वर्ष उत्पन्न** |
|---|---|---|---|---|---|
| **१)** | | | | | |
| **२)** | | | | | |
| **३)** | | | | | |
| **४)** | | | | | |
| **५)** | | | | | |

**तक्ता क्र. ११**

**बाजार समितीमध्ये निर्माण करावयाच्या सुविधाचा प्रधान्य क्रम.**

| अ. क्र. | **सुविधा** | **क्षमता** | **अंदाजे खर्च** | **उपलब्ध निधी** | **अनुदान** | | **कर्ज** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **यंत्रणा** | **रक्कम लाख** | |
| **१)** | | | | | | | |
| **२)** | | | | | | | |
| **३)** | | | | | | | |
| **४)** | | | | | | | |
| **५)** | | | | | | | |

**सचिव**
**कृ.उ.बा.स--------**

**सभापती**
**कृ.उ.बा.स--------**

सोबत –

१. संचालक मंडळाचा ठराव
२. संमतीपत्र

## प्रपत्र- अ

# विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत  पणन विभागाचा सन २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीचा कृती आराखडा

| Vision 2025-26 T0 29-30 विवरणपत्र क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SN | Theme | 2029 | पुढील ५ वर्षासाठी अंदाजित खर्च (रु.कोटी) | | | | | | Gov | Magnet २.० | Pp |
| | | | 25-26 | 26-27 | 27-28 | 28-29 | 29-30 | Total | | | |
| 1 | APMC Strengthening | 300 APMCS strengthened; unified trading license operational | 0 | 50 | 75 | 75 | 105 | 305 | 0 | 0 | 0 |
| | | 2326 Cr | 0 | 380 | 564 | 572 | 810 | 2326 | 2326 | 0 | 0 |
| 2 | Market Infrastructure | 100 sub-markets | 0 | 20 | 25 | 25 | 30 | 100 | 0 | 0 | 0 |
| | | 500 Cr | 0 | 100 | 125 | 125 | 150 | 500 | 500 | 0 | 500 |
| 3 | Export Facilities (PPP) | 25 facilities | 0 | 2 | 5 | 8 | 10 | 25 | 0 | 0 | 0 |
| | | 500 Cr | 0 | 40 | 100 | 160 | 200 | 500 | 0 | 0 | 0 |
| 4 | Notify 3–4 Global Market Hubs | No. of Global Market Hubs | 0 | 4 | 0 | 0 | 0 | 4 | 0 | | 0 |
| | | 0 Cr | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | Operationalize Export Facilitation Desks | No. of Export Facilitation Desks | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 |
| | | 33.24 Cr | 0 | 0.00 | 11.40 | 10.40 | 11.44 | 33.24 | 0 | 33.24 | 0 |
| 6 | Launch “MSAMB Certified – Traceable Maharashtra” branding | No. of beneficiaries (FPCs/ Exporters) linked with brand | 0 | 0 | 50 | 100 | 200 | 350 | 0 | 0 | 0 |
| | | 15.1 Cr | 0.00 | 0.00 | 4.85 | 5.00 | 5.25 | 15.10 | 0 | 15.10 | 0 |
| 7 | Market Intelligence | Establish CMIW with quarterly commodity reports (APMCs, PMLs, DMLs) | 0 | 146 | 292 | 438 | 591 | 591 | 0 | 0 | 0 |
| | | | 0 | 48.01 | 40.64 | 40.64 | 52.72 | 182.01 | 0 | 182.01 | 0 |
| 8 | MSWC | | 0 | 124.9 | 135.9 | 77.4 | 76.35 | 414.45 | 100 | 0 | 0 |
| Total | | | | | | | | 3970.8 | 2926 | 230.35 | 500 |

**प्रपत्र-ब**

(१) **योजनेचे नाव** - **"राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण करणे."**

(२) **योजनेचा उद्देश** - राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी व इतर बाजार घटकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. अनेकदा मोठ्या प्रमाणावर शेतमालाचे नुकसान होते किंवा शेतमालाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. याशिवाय थेट पणन, खाजगी बाजार या सारख्या पर्यायी बाजार व्यवस्थेमुळे बाजार समित्यांना स्पर्धा निर्माण झाली आहे. बाजार आवारात जास्तीत जास्त शेतकरी आकर्षित होतील यासाठी शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आवश्यक मूलभूत सुविधा पुरविणे अत्यंत गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन खालील उद्देशपूर्तीसाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांना पायाभूत सुविधा विकास कामांसाठी राज्य शासनाकडून वित्तीय सहाय्य करणे.

**अ.** बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांसाठी पायाभूत, मुलभूत व मूल्यवर्धित सुविधा निर्माण करणे.
**आ.** बाजार समित्यांना उत्पन्नाची विविध स्त्रोत निर्माण करुन देणे.
**इ.** काढणीपश्चात शेतमालाचे नुकसान कमी करणे.
**ई.** शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे.
**उ.** सुक्ष्म प्रक्रिया उद्योग उभारणे.
**ऊ.** विक्री व्यवस्थेचा नियोजित, दिशादर्शक व गतिमान विकास करणे

(३) **योजनेसाठी लाभार्थी** - राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या लाभार्थी असतील.

(४) **योजनेचे स्वरुप**- महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ राज्यातील प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी खालीलपैकी आवश्यक पायाभूत,मुलभूत व मुल्यवृध्दी सुविधांचा सन २०२६-२७ चा अद्ययावत आराखडा तयार करेल व त्या आराखडयानुसार संबंधित बाजार समितीला या योजनेअंतर्गत बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी खालीलपैकी अत्यावश्यक विविध पायाभूत व मुलभूत सुविधा घेता येतील.

**१. पायाभूत सुविधा**

| अ.क्र | पायाभूत सुविधा | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | अडत गाळे | उत्पादित घटक |
| २ | शेतमालासाठी लिलाव ओटे | उत्पादित घटक |
| ३ | व्यापारी गाळे | उत्पादित घटक |
| ४ | गोदाम | उत्पादित घटक |
| ५ | कोल्ड स्टोरेज | उत्पादित घटक |
| ६ | इलेक्ट्रॉनिक वजनकाटे | उत्पादित घटक |
| ७ | भुईकाटे | उत्पादित घटक |

| | | |
|---|---|---|
| ८ | पेट्रोल पंप | उत्पादित घटक |
| ९ | हमीभाव खरेदी केंद्रे | उत्पादित घटक |
| १० | जनावरे बाजार सोयी सुविधा | उत्पादित घटक |
| ११ | मत्स्य बाजार सोयी सुविधा | उत्पादित घटक |
| १२ | वाहनतळ सोयी सुविधा | उत्पादित घटक |
| १३ | बाजार आवारात बँकिंग सुविधा | उत्पादित घटक |
| १४ | माती, पाणी परीक्षण केंद्र | उत्पादित घटक |
| १५ | शेतमाल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा | उत्पादित घटक |
| १६ | अंतर्गत रस्ते | अनुत्पादित घटक |
| १७ | ड्रेनेज लाईन | अनुत्पादित घटक |
| १८ | विद्युत सोयी सुविधा | अनुत्पादित घटक |
| १९ | कार्यालयीन इमारत | अनुत्पादित घटक |
| २० | कंपाऊंड वॉल | अनुत्पादित घटक |
| २१ | संगणकीकरण | अनुत्पादित घटक |
| २२ | ई- ऑक्शन सुविधा | अनुत्पादित घटक |
| २३ | ऑनलाईन पेमेंट | अनुत्पादित घटक |
| २४ | इलेक्टॉनिक डिसप्ले बोर्ड | अनुत्पादित घटक |
| २५ | ई-नाम सुविधा | अनुत्पादित घटक |
| २६ | बाजार यार्ड मध्ये CCTV | अनुत्पादित घटक |
| २७ | आवारात आलेल्या शेतमालाचे ऊन पाऊसापासून संरक्षण करण्यासाठी बाजार आवारात शेड बांधणे | अनुत्पादित घटक |
| २८ | संबंधित बाजार समितीच्या व्यवसाय आराखडयात नमूद विशिष्ट पायाभूत सुविधा | अनुत्पादित घटक |

## २. मुलभूत सुविधा

| अ.क्र. | मुलभूत सुविधा | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | कँटीन | अनुत्पादित घटक |
| २ | पिण्याच्या पाण्याचा आर.ओ.प्लँट | अनुत्पादित घटक |
| ३ | स्वच्छतागृह(स्त्री पुरुषांसाठी स्वतंत्र) | अनुत्पादित घटक |
| ४ | संबंधित बाजार समितीच्या व्यवसाय आराखडयात नमूद विशिष्ट मूलभूत सुविधा | अनुत्पादित घटक |

**३. मुल्यवृद्धी सुविधा:-**

| **अ.क्र.** | **मुल्यवृद्धी सुविधा** | **वर्गवारी** |
|---|---|---|
| **१.** | पॅक हाऊस, प्रिकुलिंग, कोल्ड स्टोअरेज, आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री (निर्यात सोयी सुविधा) | उत्पादित घटक |
| **२.** | धान्य चाळण यंत्रणा | उत्पादित घटक |
| **३.** | Turmeric / Dal mill | उत्पादित घटक |
| **४.** | Oil mill | उत्पादित घटक |
| **५.** | सुत गिरणी | उत्पादित घटक |
| **६.** | नाशवंत मालाचे अत्याधुनिक ग्रेडिंग पॅकींग यंत्रणा | उत्पादित घटक |
| **७.** | शेतमालासाठी डिहायड्रेशन प्लँट अथवा तत्सम प्रक्रिया यंत्रणा | उत्पादित घटक |
| **८.** | सुक्ष्म प्रक्रिया उद्योग ( कांदा पावडर, टोमॅटो पल्प, इ.) | उत्पादित घटक |
| **९.** | सोलर सिस्टीम / रेन वॉटर हार्वेस्टिंग | उत्पादित घटक |
| **१०.** | कंपोस्ट खत / गांडूळ खत प्रकल्प | उत्पादित घटक |
| **११.** | बी -बियाणे, खते व औषधे दुकान | उत्पादित घटक |
| **१२.** | शेतमाल अवजारे दुकान | उत्पादित घटक |
| **१३.** | संबंधित बाजार समितीच्या व्यवसाय आराखडयात नमूद विशिष्ट मुल्यवृद्धी सुविधा | उत्पादित घटक |

१) सदरच्या योजनेमध्ये उत्पादक घटकांना प्राधान्य देण्यात येईल.

२) सदर योजनेअंतर्गत बाजार समितीस एकदाच लाभ अनुज्ञेय राहील.

**(५) योजनेसाठी अर्थसहाय्य स्वरुप** -

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणासाठी उपरोक्त (३) येथे नमूद पायाभूत सुविधा विकास कामे **सन २०२६-२७ ते २०२९-३० या ४ वर्षात घेण्यासाठी** बाजार समित्यांच्या उत्पन्नाच्या वर्गवारीनुसार अ व ब वर्ग कृषि उत्पन्न बाजार समित्यांना पायाभूत सुविधा विकासाकरीता कमाल ८ कोटी किंमतीची कामे घेण्यासाठी तर क व ड वर्ग कृषी उत्पन्न बाजार समित्यांना पायाभूत सुविधा विकासाकरीता कमाल ६ कोटी किंमतीची कामे घेण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार अंदाजपत्रकीय किंमतीच्या १०० टक्के शासन अनुदान अनुज्ञेय राहील.

**(रक्कम रु.कोटी )**

| **बाजार समितीचा वर्ग** | **बाजार समित्यांची संख्या** | **प्रति बाजार समिती शासन अनुदान टक्केवारी** | **प्रति बाजार समिती कमाल अनुज्ञेय अंदाजित खर्च रुपये** | **एकूण आवश्यक अंदाजित शासन अनुदानाची रक्कम** |
|---|---|---|---|---|
| अ | १९४ | १०० टक्के | ८ | १५५२.०० |
| ब | ५४ | १०० टक्के | ८ | ४३२.०० |
| क | २७ | १०० टक्के | ६ | १६२.०० |
| ड | ३० | १०० टक्के | ६ | १८०.०० |
| | | | एकूण | २३२६.०० |

उपरोक्त प्रमाणे ४ वर्षासाठी अंदाजे रु.२३२६.०० कोटी शासन अनुदानाची आवश्यकता आहे.

(६) **बाजार समिती निवडीचे निकष**

दि.१ एप्रिल २०२५च्या शासन निर्णयानुसार राज्यात "अ" व "ब" वर्ग २४८ आणि "क" व "ड" वर्ग ५७ इतक्या बाजार समित्या आहेत. बाजार समित्यांची संख्या विचारात घेता, प्रति वर्षी सदर योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे बाजार समित्यांचे बळकटीकरणाचे प्रस्ताव विचारात घेण्यात यावेत.

| **अ.क्रं.** | **सन** | **निधी तरतुद (रु. कोटी)** | **अ व ब वर्गातल्या बाजार समित्या** | **क व ड वर्गातल्या बाजार समित्या** | **एकुण बाजार समिती संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | २०२५-२६ | ०० | ० | ० | ० |
| **२.** | २०२६-२७ | ३८० | ४० | १० | ५० |
| **३.** | २०२७-२८ | ५६४ | ५७ | १८ | ७५ |
| **४.** | २०२८-२९ | ५७२ | ६१ | १४ | ७५ |
| **५.** | **३०-२०२९** | ८१० | ९० | १५ | १०५ |
| | एकुण | २३२६ | २४८ | ५७ | ३०५ |

*** बाजार समितीस **एकदाच लाभ** अनुज्ञेय राहील.

(७) **लाभार्थी निवडीचे निकष-** कृषी उत्पन्न बाजार समितीने खालील निकषांची पूर्तता केली असावी.

**१)** बाजार समितीचे मागील आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण झालेले असणे आवश्यक असून त्यामध्ये गंभीर दोष नसावेत .

**२)** बाजार समितीकडे देखरेख शुल्क (Supervision Fee ) प्रलंबित नसावे.

३) महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कर्ज व अंशदानाची थकबाकी नसावी.

४) बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी विविध पायाभूत व मुलभूत आवश्यक सुविधा घेण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चापैकी संबंधित बाजार समितीचा स्वनिधी त्यांच्याकडे उपलब्ध असणे आवश्यक असेल.

५) बाजार समितीचा आस्थापना खर्च विहित मर्यादेपेक्षा कमी असावा.

६) महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ अन्वये बाजार समितीची कोणतीही चौकशी चालु नसावी.

(८) **योजनेची अंमलबजावणी-** योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**१.** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने प्रथम राज्यातील प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बळकटीकरणाच्या अनुषंगाने आवश्यक पायाभूत,मुलभूत व मुल्यवृध्दी सुविधांचा आढावा घेऊन, सन २०२६-२७ चा अद्ययावत आराखडा तयार करावा.

**२.** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने तयार केलेल्या संबंधित बाजार समित्यांच्या २०२६-२७ च्या बळकटीकरण आराखड्यानुसार या योजनेअंतर्गत बाजार समित्यांना बळकटीकरणासाठी अत्यावश्यक विविध पायाभूत व मुलभूत सुविधा घेता येतील.

**३.** प्रत्येक बाजार समितीस एकदाच हा लाभ अनुज्ञेय राहील.

**४.** बाजार समित्यांच्या २०२६-२७ च्या बळकटीकरण आराखडयानुसार, बाजार समितीच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सुविधांची निकड विचारात घेऊन बाजार समितीने अंदाजपत्रक तयार करावे. अंदाजपत्रकासह प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयांमार्फत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांना सादर करावा.

**५.** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने, बाजार समितीने प्रस्तावित केलेली कामे २०२६-२७ च्या बळकटीकरण आराखडयानुसार आहेत का व ती योग्य आहेत किंवा कसे, याबाबतची प्राथमिक स्तरावर छाननी करावी. तदनंतर पणन मंडळामध्ये कार्यरत असलेल्या अभियंता (स्थापत्य) यांनी बाजार समितीच्या अंदाजपत्रकाची तांत्रिक छाननी करावी.

**६.** तदनंतर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने बाजार समित्यांचे परिपूर्ण प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावेत.

**७.** संबंधित बाजार समितीच्या प्रस्तावास शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाईल.

**८.** प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, विहित कार्यपध्दतीनुसार राज्य स्तरावरुन *(महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून )* ई-निविदा प्रक्रिया राबवली जाईल.

**९.** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने प्राप्त निविदांची प्राथमिक छाननीअंती पात्र निविदांची यादी करावी व त्यापैकी न्यूनतम ५ निविदांचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करावा.

**१०.** शासनाकडून अंतिम निविदेची निवड करण्यात येईल.

**११.** त्यानुसार बाजार समित्यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली कामे सुरु करावीत.

**१२.** शासनाकडून मंजूर केलेले अनुदान ५०% व ५०% याप्रमाणे २ हप्त्यात संबंधित बाजार समितीस थेट वितरीत करण्यात येईल.

**१३.** बांधकामाच्या भौतिक प्रगती अहवालानुसार (Physical Progress Report)महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने बाजार समितीची मंजूर कामे ५० टक्के पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व अनुदानाच्या पहिल्या हप्त्याच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास सादर केल्यानंतर सादर केल्यानंतर, उर्वरित ५०% शासन अनुदान वितरीत करण्यात येईल.

**१४.** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने सदर योजनेसाठी आवश्यक निधीच्या मागणीचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

**१५.** सदर योजनेसाठी आवश्यक निधी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास शासनाकडून वितरीत करण्यात येईल.

**१६.** शासन अनुदानाची रक्कम महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून संबंधित बाजार समित्यांच्या खात्यावर थेट जमा करण्यात येईल.

**१७.** शासन अनुदानाचे एकूण खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने शासनास सादर करावे.

**१८.** प्रत्येक बाजार समितीच्या बळकटीकरणासाठीच्या पायाभूत सुविधांच्या कामास शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर ते काम कमाल ३ वर्षाच्या आत पूर्ण करणे आवश्यक राहील.

**१९.** या योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहतील.

**२०.** बळकटीकरणासाठीच्या पायाभूत सुविधांवरील देखभाल व दुरुस्तीचा खर्च हा संबंधित बाजार समितीने करणे बंधनकारक राहील. त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही.

**(९)** **योजनेचा कालावधी-** सदर योजना सन २०२६-२७ ते २०२९-३० या चार आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यात येईल.

**प्रपत्र-क**

(१) **योजनेचे नाव** - "राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे 'उपबाजार विकास अर्थसहाय्य योजना'"

(२) **योजनेचा उद्देश**

१. शेतमालाचे काढणीपश्चात (POST HARVEST LOSSES) होणारे नुकसान कमी करणे
२. उपबाजारांच्या माध्यमातुन २५००० कोटी किंमतीचा शेतमाल बाजार व्यवस्थेत आणणे.
३. सार्वजनिक खाजगी भागीदारीतुन (PPP) उपबाजारांचा विकास करणेस प्राधान्य देणे.
४. उपबाजारांच्या जागेवर खाजगी बाजार उभारणीस प्राधान्य देणे.
५. विशेष वस्तु बाजाराला चालना देणे
६. प्राथमिक प्रक्रिया (Primary Processing) सुविधा निर्माण करणे.
७. मत्स्यबाजार निर्माण करणे.
८. मांजरी जि. पुणे उपबाजारांच्या धर्तीवर बाजार विकास करणेस प्राधान्य देणे **(शेतकरी ते थेट खरेदीदार विक्री)**

(३) **योजनेसाठी लाभार्थी** - राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या लाभार्थी असतील.

(४) **योजनेचे स्वरुप-**

१. योजनेतुन प्राप्त होणारे अर्थसहाय्य हे अनुदान स्वरुपात राहील,
२. बाजार समितीस एकदाच लाभ अनुज्ञेय राहील.
३. राज्य कृषि पणन मंडळाने बाजार समिती निहाय तयार केलेल्या बळकटीकरण आराखडयानुसार बाजार समित्यांना पुढील सुविधा घेता येतील.

(५) **योजनेतील पात्र घटक**

**अ. उत्पादित घटक –**

शेतमालासाठी लिलाव ओटे, गोदाम, कोल्ड स्टोरेज, अडत गाळे, हमीभाव खरेदी केंद्रे, व्यापारी गाळे, भुईकाटे, पेट्रोल पंप, जनावरे बाजार सोयी सुविधा, मत्स्य बाजार इ.

**आ. अनुत्पादीत घटक (पायाभूत सुविधा)-**

अंतर्गत रस्ते, ड्रेनेज लाईन, विद्युत सोयी सुविधा, कार्यालयीन इमारत, संगणकीकरण, ई-ऑक्शन सिस्टीम, ऑनलाईन पेमेंट, इलेक्ट्रोनिक डिसप्ले बोर्ड, ई-नाम सुविधा, बाजार यार्ड मध्ये **CCTV**, बाजार आवारात आलेल्या शेतमालाचे ऊन पाऊसापासून संरक्षण करण्यासाठी बाजार आवारात शेड बांधणे इ.

**इ. मूलभूत सुविधा –**

कँटीन,पिण्याच्या पाण्याचा आर.ओ.प्लँट,,स्वच्छतागृह (स्त्री /पुरुषांसाठी स्वतंत्र)इ.

*** उत्पादक घटक हे शासनाकडुन मिळणाऱ्या अनुदानास पात्र राहतील.**

**** अनुत्पादक व मुलभूत सुविधा या स्वनिधीतुन उभारणे आवश्यक आहे.**

***** जमिन विकास व कंपाऊंड वॉल हे घटक अनुदानास पात्र राहणार नाहीत.**

**(६) <u>योजनेसाठी अर्थसहाय्य स्वरुप</u> -**

**अर्थसहाय्याचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.**

**अ.** उपबाजाराचा विकास बाजार समितीमार्फत करणे (बाजार समितीकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्यास)

**आ.** उपबाजाराचा विकास बाजार समिती व खाजगी भागीदार यांच्या संयुक्त भागीदारीतुन करणे. (बाजार समितीकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास)

**इ.** उपबाजाराचा विकास पुर्णत: खाजगी भागीदारीतुन करणे (बाजार समितीची जमिन किंमत व अनुदान ही प्रकल्पात गुंतवणुक राहील) (बाजार समितीकडे निधी उपलब्ध नसल्यास)

**१)** सदर योजनेंतर्गत उपबाजाराचा विकास करण्यासाठी राज्य शासनामार्फत देण्यात येणारे अर्थसहाय्य हे अनुदान स्वरुपात असेल.

**२)** सदर योजनेंतर्गत उपबाजाराचा विकास करण्यासाठी प्रति प्रकल्प रु.५.०० कोटी इतके शासन अनुदान अनुज्ञेय राहील.

**३)** शासनाकडून मंजुर अनुदान दोन टप्प्यात वितरीत करण्यात येईल.

**४)** शासनाकडून मंजूर अनुदान रक्कमेच्या ५० टक्के रक्कम, प्रकल्प उभारणीचे ५० टक्के कामकाज पूर्ण झाल्याचा दाखला महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर, लाभार्थींच्या बँक खाते/कर्ज खात्यात जमा करण्यात येईल. उर्वरीत ५० टक्के शासन अनुदानाची रक्कम प्रकल्प उभारणीचा पूर्णत्वाचा दाखला महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर लाभार्थींच्या बँक खाते /कर्ज खात्यात जमा करण्यात येईल

**(७) योजनेचे लक्षांक व आवश्यक शासन निधी -**

१. **लक्षांक**

| **पुढील ५ वर्षासाठी उपबाजार संख्या** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२५-२६** | **२६-२७** | **२७-२८** | **२८-२९** | **२९-३०** | **एकुण** |
| ० | २० | २५ | २५ | ३० | १०० |

२. **निधी**

| **पुढील ५ वर्षासाठी अंदाजित खर्च (रु.कोटी)** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२५-२६** | **२६-२७** | **२७-२८** | **२८-२९** | **२९-३०** | **एकुण** |
| **०** | **१००** | **१२५** | **१२५** | **१५०** | **५००** |

**एकुण निधी - अंदाजे रु.** ५०० **कोटी**

**(८) <u>बाजार समिती निवड व निकष-</u>**

**अ. बाजार समित्यांची निवड**

१. बाजार समितीची स्वारस्य निविदा द्वारे निवड

२. खाजगी भागीदाराची निवड पणन मंडळ/बाजार समितीमार्फत स्वारस्य निविदा प्रक्रियेतुन करणार.

३. बाजार समिती संचालक मंडळाचा ठराव व संमती पत्र

**आ. बाजार समिती निवडीचे मुख्य निकष**

१. उपबाजार विकासाची आवश्यकता

२. स्वनिधी गुंतवणुकीची क्षमता

३. कर्ज परतफेडीची क्षमता

४. खाजगी गुंतवणुकदारांचा प्रतिसाद

५. कार्यक्षेत्रातील शेतमालाचे उत्पादन व आवक

६. जिल्हास्तरावरील व मोठ्या तालुकास्तरावरील मुख्य बाजार आवारामध्ये जागा उपलब्ध नसणाऱ्या बाजार समित्यांना प्राधान्य.

**(९) योजनेची अंमलबजावणी-** सदर योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

१. या योजनेची नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ हे कामकाज पाहतील.

२. सदर योजनेची प्रशासकीय प्रक्रिया महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ किंवा त्यांनी नेमलेल्या सल्लागार एजन्सी (PMU) यांचे मार्फत राबविण्यात येईल. यासाठी बाजार समिती स्तरावर PIU (Project Implementation Unit) स्थापन करणेत येतील.

३. सदर योजनेसाठी पणन मंडळामार्फत नियुक्त सल्लागार एजन्सी मार्फत किंवा खाजगी गुंतवणूकदारामार्फत व्यवसाय विकास आराखडा/प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल.

४. प्रकल्प अहवाल बाजार समितीमार्फत पणन मंडळास सादर करण्यापूर्वी खालील बाबींची आवश्यकता राहील.

i. बाजार समिती प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता घेवुन पणन मंडळास सादर करेल किंवा खाजगी गुंतवणुकदार पुर्ण प्रकल्प अहवाल बाजार समितीमार्फत पणन मंडळास सादर करतील.

ii. प्रकल्प अहवालास बाजार समिती संचालक मंडळाचा ठराव व संमती पत्र

iii. कलम १२ (१) व बाजार समिती आराखड्यास (लेआऊट) मान्यता

iv. स्थानिक प्राधिकरणांची मान्यता

v. कर्ज मंजुरीचे बँकेचे पत्र

(शासनाकडुन MACP च्या धर्तीवर कलम १२(१) अन्वये प्रकल्प किमत व बांधकामस सर्वसमावेशक मान्यता प्रस्तावित.)
(कलम ३२ अन्वये बॅककडुन कर्ज घेण्याबाबत सर्वसमावेशक मान्यता प्रस्तावित.)

५. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने बाजार समित्यांकडून सदर योजनेंतर्गत प्राप्त प्रस्तावाची तांत्रीक व प्रशासकीय तपासणी/छाननी प्रक्रिया त्यांच्या स्तरावर राबवावी.

६. तदनंतर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने बाजार समित्यांचे परिपूर्ण प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावेत.

७. संबंधित बाजार समितीच्या प्रस्तावास शासनाच्या प्रशासकीय विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाईल.

८. संबंधित बाजार समितीच्या प्रस्तावास शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, विहित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

९. संबंधित बाजार समितीच्या उपबाजाराच्या विकास योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामासाठी कमाल ५ कोटी शासन अनुदान म्हणून अनुज्ञेय राहील. सदर अनुज्ञेय शासन अनुदान ५०% व ५०% याप्रमाणे २ टप्प्यात वितरीत करण्यात येईल.

१०. संबंधित बाजार समितीने उपबाजाराच्या विकास योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामासाठीचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर व त्याप्रमाणे बाजार समितीचा निधी मागणीचा प्रस्ताव पणन मंडळास पाठवावा.

११. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने सदर योजनेसाठी आवश्यक निधीच्या मागणीचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

१२. पणन मंडळाकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करण्यासाठी शासन अनुदानाचा पहिल्या टप्प्याचा आवश्यक निधी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास शासनाकडून वितरीत करण्यात येईल. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून शासन अनुदानाची रक्कम संबंधित बाजार समित्यांच्या खात्यावर थेट जमा करण्यात येईल.

१३. संबंधित बाजार समितीने सदर योजनेच्या कामासाठी समांतररित्या त्यांचा स्वनिधी/कर्ज या माध्यमातून उभारलेला निधी खर्च करावा.

१४. पणन मंडळाच्या अभियांत्रिकी विभागामार्फत सदर योजनेंतर्गत घेतलेल्या कामाची तपासणी करण्यात येईल. कामाच्या भौतिक प्रगतीनुसार स्वनिधी/कर्जाची रक्कम व शासन अनुदानाच्या पहिल्या टप्प्याची रक्कम खर्च केल्याची खात्री करुन त्याबाबतचा अहवाल पणन मंडळास सादर करावा.

१५. पणन मंडळाने संबंधित बाजार समितीने या योजनेंतर्गत हाती घेतलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन, प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन प्रकल्प कार्यान्वित झाल्याचे प्रमाणपत्र तसेच, शासनाने दिलेल्या पहिल्या टप्प्याच्या अनुदानाच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास सादर केल्यानंतर उर्वरित शासन अनुदानाचा दुसऱ्या टप्याचा ५०% निधी वितरीत करण्यात येईल.

१६. शासन अनुदानाची रक्कम संबंधित बाजार समित्यांच्या खात्यावर महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत जमा करण्यात येईल.

**१७.** शासनाने दिलेल्या एकूण अनुदानाच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र पणन मंडळामार्फत शासनास सादर करावे.

**१८.** सदर योजनेंतर्गत घेतलेल्या कामास शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर ते काम कमाल एक वर्षाच्या (**१२ महिने**) आत पूर्ण करणे आवश्यक राहील.

**१९.** या योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी पणन मंडळाचे संबंधित विभागीय अधिकारी हे या योजनेचे नियंत्रक म्हणून कामकाज पाहतील.

**२०.** सदर योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती, दैनंदिन खर्च, मनुष्यबळावरील खर्च, वीज, पाणी देयके इ.वरील आवर्ती खर्च हा संबंधित बाजार समितीने करणे बंधनकारक राहील. त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही.

**(१०) योजनेचा कालावधी-** सदर योजना सन २०२६-२७ ते २०२९-३० या चार आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यात येईल.